## ३) एकात्मिक तणव्यवस्थापन

### अंतरमशागत

### ■ नांग्या भरणे

सर्वसाधारण १० दिवसात सर्व बिया उगवतात. ज्या ठिकाणी बी उगवले नसेल त्या ठिकाणी राखून ठेवलेल्या बियाण्यापासूनच, त्याच वाणाचे अगर संकर वाणाचे बियाणे नांग्या भरण्यासाठी वापरावे व लगेच पाणी द्यावे. वर उल्लेख केल्याप्रमाणे पॉलिथिन पिशव्यातील रोपे २० ते २५ दिवसांच्या आतच लावावीत.

### ■ विरळणी

१५ दिवसानंतर प्रत्येक फुलीवर दोन जोमदार रोपे ठेवून बाकीची उपटून टाकावीत. विरळणी जमीन ओली असताना करावी.

### ■ खुरपणी

पेरणीनंतर जरूरी प्रमाणे खुरपण्या देऊन ७० दिवसांपर्यंत पिक स्वच्छ व तण विरहित ठेवा.

यासाठी जेथे शक्य असेल तेथे जरूरी प्रमाणे रासायनिक तणनाशकांचा वापर करावा. त्यासाठी खालीलपैकी एक रासायनिक तणनाशक वापरावे व आवश्यकतेप्रमाणे पिकाच्या खुरपण्या कराव्यात. तणनाशकांमुळे खुरपणीच्या खर्चात बचत होते.

| अ. क्र. | तणनाशकाचे नाव | क्रियाशील घटकाचे हे. प्रमाण लिटर | हेक्टरी पाण्याचे प्रमाण लिटर | फवारणीची वेळ |
|---|---|---|---|---|
| १) | डायुरॉन | ०.५ | ५०० | उगवणीनंतर लगेच एक फवारा द्यावा |
| २) | फ्ल्युक्लोरॅलीन (बासालीन) | १.५ | ५०० | उगवणीपूर्वी एक फवारा व पेरणीनंतर एक महिन्याने दुसरा फवारा द्यावा. |
| ३) | पेन्डीमिथॅलिन | १.५ | ५०० | उगवणीपूर्वी एक फवारा द्यावा. |

### ■ कोळपणी

पिक एक ते दिड महिन्याचे झाल्यानंतर पिकाला मातीची भर दुसऱ्या कोळपणीच्या वेळेस देणे अत्यंत आवश्यक आहे. कोळपणीसाठी ''नारायण कोळपे'' वापरावे.